## आंतरराज्य शेतमाल व्यापार : रस्ते वाहतूक अनुदान योजना (सुधारीत)

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

प्लॉट क्रं.आर-७, मार्केट यार्ड,गुलटेकडी,पुणे ३७

मराकृपमं/देशांतर्गत व्यापार विकास/रस्ते वाहतूक अनुदान योजना/ ९२८/२०२०

दिनांक: २३/०६/२०२०

**प्रस्तावना:**

फळे-भाजीपाला उत्पादनामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे.विशेषत:कांदा,टोमॅटो,डाळींब,द्राक्षे,केळी, आंबा तसेच भाजीपाल्याचे राज्यात मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेण्यात येते. फळे-भाजीपाला नाशवंतअसल्याने अनेक वेळा अयोग्य हाताळणीमुळे तसेच वाहतूकीदरम्यान होणा-या विलंबामुळे सुमारे २०ते ३० टक्के शेतमालाचे नुकसान होते.महाराष्ट्रातील फळे व भाजीपाल्याचे उत्पादन पाहता, निर्यातीबरोबरच देशांतर्गत व्यापारही महत्त्वाचा असल्याने राज्यात उत्पादित शेतमालास परराज्यात बाजारपेठ मिळवून थेट व्यापारास चालना देणे आवश्यक आहे. शेतमाल उत्पादक शेतकरी सहकारी संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना (एफ.पी.सी.) अनेक वेळा केवळ वाहतूक खर्च परवडत नसल्याने नाशवंत शेतमाल परराज्यात पाठविण्यास मर्यादा येतात.शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांमार्फत राज्यातील शेतमालाच्या आंतरराज्यीय व्यापारास चालना देण्याच्या दृष्टीने वाहतूक खर्चात अनुदान देण्याची बाब पणन मंडळाच्या विचाराधीन होती.

**निर्णय:**

महाराष्ट्रातून शेतमालाच्या आंतरराज्यीय व्यापारास चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत रस्ते वाहतूक अनुदान योजना राबविण्यात येणार आहे.त्याअनुषंगाने योजनेच्या दिनांकापासुन दि.३१.३.२०२३ या कालावधीपर्यंत देशांतर्गत रस्ते वाहतूक भाड्यामध्ये अनुदान (Transport Subsidy) देण्यासाठी पुढीलप्रमाणे योजना घोषित करण्यात येत आहे. सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे,

१. सदर योजना केवळ महाराष्ट्रातून रस्ते वाहतूकीद्वारे परराज्यात शेतमाल वाहतूक करून प्रत्यक्ष विक्री करण्यात येणा-या व्यवहारासाठी लागू राहील.
२. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था योजनेअंतर्गत अनुदान मिळणेस्तव पात्र असतील.
३. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या,शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या सभासदांनी स्वत: उत्पादित केलेला शेतमालच संबधीत राज्यामध्ये पाठविणे आवश्यक असेल.

४. योजनेंतर्गत कामकाज सुरू करणेपुर्वी अर्जदार संस्थेने पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

५. सदर योजना आंबा, केळी, डाळींब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या नाशवंत पिकांसाठीच लागू राहील.तसेच यामध्ये नमूद नसलेला नाशवंत शेतमाल परराज्यात विक्री करावयाचा झाल्यास लाभार्थी संस्था/ कंपनीने तसा स्पष्ट उल्लेख करून पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणेआवश्यक राहील.

६. सदर योजनेमध्ये रस्तेमार्गे प्रत्यक्ष वाहतूक होणा-या शेतमालावर अनुदान देय राहील.यामध्ये इतर कोणत्याही अनुषंगिक खर्चाचा अंतर्भाव असणार नाही तसेच शेतमाल प्रत्यक्ष विक्री झालेनंतरच अनुदान देय राहील.

७. या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष वाहतूक केलेल्या अंतरानुसार खालीलप्रमाणे अनुदान देय असेल.

| अ.क्र. | अंतर | देयअनुदान |
|---|---|---|
| १ | किमान ३५० ते ७५० कि. मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.२०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| २ | ७५१ ते १००० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.३०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ३ | १००१ ते १५०० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.४०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ४ | १५०१ ते २००० कि.मी.पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ५ | २००१ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.६०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ६ | सिक्कीम, आसाम, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम,मेघालय व त्रिपुरा या राज्यासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.७५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |

८. महाराष्ट्रातील सीमेलगतच्या जिल्ह्यातील शेतमाल नियमीतपणे लगतच्या परराज्यात जात असल्याने अपरंपरागत व दूरवरील बाजारपेठांमध्ये शेतमाल पाठविणे अर्थक्षम होण्याच्या दृष्टीने ३५० कि.मी.पेक्षा कमी अंतरावरील वाहतूकीस कोणतेही अनुदान देय असणार नाही.

९. या योजनेअंतर्गत एका लाभार्थी शेतमाल उत्पादक सहकारी संस्था/उत्पादक कंपनीस एका आर्थिक वर्षात कमाल रू.३.०० लाख एवढे वाहतूक अनुदान देय असेल. सदर अनुदान केवळ महाराष्ट्रातून इतर राज्यात केलेल्या एकेरी वाहतूकीस लागू असेल.

१०. या योजनेअंतर्गत बिगर कृषिमालाची वाहतूक केल्याचे आढळल्यास त्यासाठी अनुदान देय असणार नाही.

११. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेने वाहतूकदारास देय असलेली वाहतूक भाड्याची रक्कम धनादेश/आरटीजीएस/ऑनलाईन बँकींगद्वारे अदा करणे बंधनकारक राहील.

१२. शेतकरी उत्पादक कंपनी/ सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाच्या प्राप्त विक्री रक्कमेतून अनुषंगीक खर्च जसे, शेतमालाची हाताळणी, विरळणी, वर्गीकरण, पॅकींग, हमाली, वाहतुक, व कंपनी/संस्थाचे सर्व्हिस चार्जेस इत्यादी खर्च,कपात करुन उर्वरीत रक्कम संबंधित उत्पादक सभासदांच्या खात्यावर वर्ग केल्यानंतर वाहतूक अनुदानासाठी अर्ज करू शकतील. कपात रक्कम व अनुषंगिक आर्थिक व्यवहार ही संबधित कंपनी/संस्था व उत्पादक सभासद शेतकरी यांची अंतर्गत बाब राहील. याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा कोणताही संबध असणार नाही.

१३. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाला गुणवत्ते अभावी अथवा अन्य कारणामुळे विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जबाबदार असणार नाही तसेच सदर प्रकरणी वाहतूक अनुदान देय असणार नाही.

१४. अनुदान संपुर्णपणे नामंजूर,अंशत:मंजूर अथवा पुर्णपणे मंजूर करण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारावर बंधनकारक असेल.तसेच,योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये उचित बदल करण्याचे अधिकार पणन मंडळास राहतील.

१५. संबंधीत शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी या योजनेअंतर्गत परराज्यात पाठविण्यात आलेल्या वाहतूक खर्चाचे अनुदान मागणी प्रस्ताव शेतमाल विक्रीनंतर ३० दिवसांत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत.

१६. परराज्यात शेतमाल पाठवित असताना १ कन्साईनमेंट मध्ये शेतकरी उत्पादक कंपनी / संस्थेच्या किमान ३ उत्पादक शेतकरी सभासदांचा शेतमाल एकत्रितपणे पाठविणे आवश्यक राहील.

आंतरराज्य शेतमाल रस्ते वाहतूक अनुदान मागणी प्रस्तावासोबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्याकडे उपरोक्त अटी व शर्तीस अनुसरून खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करावीत.

**अ) पुर्वमान्यता प्रस्ताव** : (प्रपत्र- १ विहीत नमुन्यात)

१. पुर्वमान्यता अर्ज
२. शेतकरी उत्पादक कंपनी / शेतमाल उत्पादकांची सह.संस्थेच्या नोंदणी पत्राची सत्यप्रत
३. शेतकरी उत्पादक कंपनी/शेतमाल उत्पादकांच्या सह.संस्थेच्या सभासदत्वाचा दाखला (यादी)
४. सभासदांचा अद्यावत ७/१२ उतारा (पिक पेरा नोंदीसह)
५. शेतकरी उत्पादक कंपनी/ शेतमाल उत्पादकांची सह.संस्थेची राष्ट्रीयकृत/सहकारी बँकेच्या पासबुकची अद्यावत छायांकीत व साक्षांकित प्रत
६. शेतकरी उत्पादक कंपनी / सह.संस्थाची लगतच्या वर्षातील लेखापरिक्षित आर्थिक पत्रके

**ब) अनुदान मागणी अर्ज** (प्रपत्र- २ विहीत नमुन्यात)

१. पुर्वमान्यतेच्या पत्राची प्रत
२. ट्रान्सपोर्ट कंपनीचे मुळ बिल
३. ट्रान्सपोर्ट कंपनीची (बिल्टी / एलआर नंबर सह) पावती
४. शेतमाल विक्रीपश्चात खरेदीदाराकडुन देण्यात आलेली मुळ बील/पट्टी
५. शेतकरी उत्पादक कंपनी/संस्थेच्या सभासदाचा शेतमाल विक्रीपोटी प्राप्त रक्कमेतून अनुषंगिक खर्च कपात करून सभासदाच्या बँक खात्यावर रक्कम वर्ग झालेल्या बँक खात्याचा तपशील

उपरोक्त अ/ब मध्ये नमूद केलेले प्रस्ताव संबंधीत कंपनी/ संस्था यांचे मुख्यालय/ कार्यक्षेत्र लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या खालील यादीत नमूद संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नाव व पत्ता | समाविष्ट जिल्हे |
|---|---|---|
| १ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पंचवटी, मार्केटयार्ड, दिंडोरी नाका,नाशिक-४२२००३,फोन नं.- (०२५३)-२५१२१७६, ई-मेल : divnsk@msamb.com | नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार, अहमदनगर |
| २ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,नविन कॉटन मार्केटयार्ड, एस.टी. स्टॅण्डसमोर,गणेशपेठ,नागपूर -४४००१८, फोन नं.- (०७१२)२७२२९९७,ई-मेल : divnag@msamb.com | नागपूर, वर्धा, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर |
| ३ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, आंबा व डाळिंब सुविधा केंद्र, प्लॉट न डी-१/१ एम.आय.डी.सी.वखार मंडळाचे गोदाम समोर , बार्शीरोड, लातूर- ४१३५३१,फोन नं.-(०२३८२) २१२०६१ ई-मेल : divltr@msamb.com | लातूर, बीड, उस्मानाबाद, नांदेड |
| ४ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, जुने कॉटन मार्केट यार्ड,अमरावती - ४४४ ६०१,फोन नं.-(०७२१) २५७३५३७ ई-मेल: divawati@msamb.com | अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा |
| ५ | उपसरव्यवस्थापक,आंबा निर्यात सुविधा केंद्र. ,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,कृषि उत्पन्न बाजार समिती रत्नागिरी . रत्नागिरी-नाचणेरोड, शांतीनगर, रत्नागिरी -४१५६३९,फोन नं.-(०२३५२) २२८३७७, ई-मेल : divrtn@msamb.com | रत्नागिरी, ठाणे, सिंधुदुर्ग, पालघर, रायगड |
| ६ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, प्लॉटनं. ५/८, पिसादेवीरोड, नवामोंढा,वखार महामंडळ गोदामाजवळ, जाधववाडी, औरंगाबाद-४३१००७,फोन नं.-(०२४०) २३३४१६८, ई-मेल : divabad@msamb.com | औरंगाबाद, हिंगोली, परभणी, जालना |
| ७ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, व्दारा-महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघ कार्यालय, मार्केटयार्ड पुणे - ४११ ०३७,फोन नं.-(०२०) २४२६१२५१ई-मेल : divpun@msamb.com | पुणे, सोलापूर |
| ८ | उपसरव्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, बाजार समिती मल्टीपर्पज हॉल इमारत,कोल्हापूर-४१६ ००५ फोन नं.-(०२३१) २६५०१६६,ई-मेल : divkol@msamb.com | सातारा, सांगली, कोल्हापूर |

(सुनिल पवार)

**कार्यकारी संचालक**

प्रत-

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय मुंबई
२. मा.मंत्री (सहकार व पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय मुंबई
३. मा.राज्यमंत्री (सहकार)यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा.राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव(पणन), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
७. अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,सर्व विभाग,मंत्रालय,मुंबई
८. व्यवस्थापकिय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या.,मुंबई
९. विभागीय आयुक्त,सर्व महसूल विभाग,(पणन संचालक,पुणे यांच मार्फत)
१०. आयुक्त,सर्व महानगरपालिका (पणन संचालक,पुणे यांच मार्फत)
११. जिल्हाधिकारी,सर्व जिल्हे (पणन संचालक,पुणे यांच मार्फत)
१२. उप सचिव (पणन), सहकार व पणन विभाग, मंत्रालय,मुंबई
१३. पणन संचालक,महाराष्ट्र राज्य,पुणे
१४.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,सर्व जिल्हे,पणन संचालक,पुणे यांचे मार्फत
१५.मुख्याधिकारी,सर्व नगरपालिका/परिषदा ,पणन संचालक,पुणे यांच मार्फत)
१६. अवर सचिव(२४-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय,मुंबई
१७.अवर सचिव(२१-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय,मुंबई
१८.उपसरव्यवस्थापक सर्व,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे

<u>प्रपत्र-१</u>

## आंतरराज्य शेतमाल व्यापार: रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत पुर्वमान्यतेसाठी अर्ज

(कंपनी/सहकारी संस्थेच्या लेटर हेडवर)

**प्रति,**

**मा.उपसरव्यवस्थापक,**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,

**विभागीय कार्यालय,** ----------------

**विषय-** आंतरराज्य शेतमाल व्यापार : रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत पुर्वमान्यता मिळणेबाबत....

**अर्जदार-** ------------------------------(शेतकरी उत्पादक कंपनी /शेतमाल उत्पादक सहकारी संस्थेचे नाव)

महोदय,

उपरोक्त नमुद विषयास अनुसरून कृषि पणन मंडळामार्फत सुरू करण्यात आलेल्या आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक योजनेमध्ये सहभागी होण्यास इच्छुक आहे.आमच्या शे.उ.कं./संस्थेची माहिती खालील प्रमाणे,

| | | |
|---|---|---|
| १. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेचे नांव | |
| २. | शे.उ.कं./ शे.उ.सह.संस्थेचा नोंदणी क्रमांक | |
| ३. | शे.उ.कं./ शे.उ.सह.संस्थेची सभासद संख्या व भागभांडवल | |

**या अर्जासोबत आम्ही खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडली आहेत,**

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | होय/नाही |
|---|---|---|
| १. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत | |
| २. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेच्या मंजूर आर्टीकल्स ऑफ असोशिएशन/उपविधीची प्रत | |
| ३. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेच्या लगतच्या वर्षाची लेखापरिक्षित आर्थिक पत्रके | |
| ४. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेच्या संचालक मंडळ सदस्यांची यादी (नाव,फोन नं शे.उ.कं./संस्थेच्या शिक्क्यासह) | |
| ५. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेचे जे उत्पादक सभासद आहेत व ज्यांचा प्रत्यक्षात शेतमाल पाठविण्यात येणार आहे त्यांचा ७/१२ उतारा पिकपेरा नोंदीसह | |
| ६. | शे.उ.कं./शे.उ.सह.संस्थेचे जे उत्पादक सभासद आहेत व ज्यांचा प्रत्यक्षात | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शेतमाल परराज्यात पाठविण्यात येणार आहे त्यांची पुढील नमून्यात माहिती | | | | | |
| | अ.क्र. | उत्पादक शेतक-याचे नाव | पत्ता व मोबाईल नंबर | शेतमाल प्रकार | वजन (क्विं.) | |
| | | | | | | |
| ७. | शे.उ.कं./ शे.उ.सह.संस्थेच्या बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत | | | | | |
| ८. | शे.ऊ.कं./ शे.उ.सह.संस्थेच्या पॅन कार्डची प्रत | | | | | |
| ९. | हमी पत्र **(परिशिष्ट-१)** | | | | | |
| १०. | शेतमाल कोणत्या राज्यात/ठिकाणी पाठविणार ते लिहावे (अंदाजे तारखेसह) | | | | | |
| ११. | वाहतूकीचे अंदाजे अंतर (कि.मी.) | | | | | |
| १२. | वाहतूकदाराकडील वाहतूक खर्चाचे अंदाजपत्रक (कोटेशन) | | | | | |

सदरील प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत सुरू असलेल्या आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत वाहतूक भाड्यामध्ये अनुदान मिळणेसाठी सादर करण्यात येत असुन अशा स्वरूपाच्या केंद्र शासन वा इतर योजनेअंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी सादर करण्यात आलेला नाही वा अनुदान घेण्यात आलेले नाही.

सबब मी प्रतिज्ञापुर्वक सांगतो की, वर दिलेली माहिती सत्य असुन, या योजनेच्या सर्व अटी व शर्ती आम्हाला मान्य आहेत. त्यानुसारच आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत पुर्व-मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करीत आहोत.

कृपया त्यास मंजूरी असावी हि विनंती.

**ठिकाण :** **आपला विश्वासु,**

**दिनांक :** (-----------------------------)

अर्जदार शे.उ.कं./सह.संस्थेचे
व्यवस्थापकीय संचालक/अध्यक्षांचे नाव व सही

## परिशिष्ट-१

## आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत अनुदानासाठी हमीपत्र

सदर हमीपत्र दिनांक.-------------------रोजी आम्ही--------------------------------------------- ज्यामध्ये लाभार्थी या विशेषणात या संदर्भातील शेतमाल उत्पादक सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी यांचा सामावेश आहे.यांना एक पक्ष मानुन व मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे-३७ यांना दुसरा पक्ष मानुन तयार करण्यात येत आहे.

ज्याप्रमाणे लाभार्थ्यांने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी प्रोत्साहनपर रस्तेमार्गे वाहतूक अनुदान देणेबाबत योजना या बाबीखाली अर्थसहाय्यासाठी पुर्व मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.आता, त्याप्रमाणे सदर हमीपत्राच्या आंतरराज्य शेतमाल रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत खालील मुद्दयांचे अनुपालन करण्यास महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे-३७ यांचेशी बांधील आहे.

१. मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे-३७ यांचे मार्फत लाभार्थीस अदा करण्यात येणा-या अनुदानाचा विनियोग ज्या कारणासाठी देण्यात येणार आहे त्या कारणासाठीच करेल.इतर कारणासाठी करणार नाही.
२. आमची ..........................................................(कंपनी/सह.संस्था नाव)शासकीय वा इतर संस्थांकडुन काळया यादीत टाकलेली नाही.
३. सदर योजनेदरम्यान प्राप्त होणारी माहीती,ज्ञान इ.तपशील महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,पुणे यांना देण्यात येईल.
४. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या आंतरराज्य शेतमाल रस्ते वाहतूक योजनेच्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असुन त्या आम्हांस मान्य आहेत व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येणा-या अटी व शर्ती आम्हांस बंधनकारक राहतील.
५. आमच्याकडुन देण्यात आलेली माहीती खोटी,चुकीची अथवा अपुर्ण दिल्याचे आढळुन आल्यास अथवा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या आंतरराज्य शेतमाल रस्ते वाहतूक योजनेच्या वाहतूक भाड्यासाठी अनुदान देण्याचे योजनेअंतर्गत कोणत्याही अटी व शर्तींचा कोणताही भंग केल्यास तसेच देण्यात येणा-या अनुदानाचा गैरवापर केल्याचे आढळुन आल्यास मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांनी लाभार्थ्यास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर त्यामध्ये, तथ्य आढळुन आल्यास अदा करण्यात आलेली अनुदान रक्कम अदा केलेल्या दिनांकापासुन पणन मंडळ निर्धारीत करील त्या दराने व्याजासह देण्याची जबाबदारी आमचे वर राहील. तसेच भविष्यात महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत

राबविण्यात येणा-या कोणत्याही अनुदान /लाभाच्या योजनेसाठी आमची ........................................................(कंपनी/सह.संस्था नाव)पात्र असणार नाही व सदरची नोंद काळ्या यादीत करण्यात येईल.

६. सभासद शेतक-यांचा उत्पादीत शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी जसे हाताळणी, पॅकींग, हमाली यासाठीचा प्रत्यक्ष झालेला खर्च कपात येईल. तसेच, सर्व्हीस चार्जेसपोठी आकारण्यात येणारी रक्कम ही वाजवी स्वरूपात आकारण्यात येईल.

७. सदरील योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांमधील उद्देशांची परिपुर्तता करण्याची बांधीलकी आमचेवर राहील.

सदर करारनामा वर उल्लेख केलेल्या तारखेस साक्षीदारांच्या साक्षीने लाभार्थीद्वारे मान्य व स्वाँक्षरीत करण्यात येत आहे.

साक्षीदार क्र.१
नाव व पत्ता-

साक्षीदार क्र.२
नाव व पत्ता-

स्वाक्षरी -
नाव -
शिक्का-
(शे.उ.कं./संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक/अध्यक्ष)

**प्रपत्र-२**

## आंतरराज्य शेतमाल व्यापार रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत अनुदान मागणी अर्ज

(कंपनी/सह.संस्थेच्या लेटर हेडवर)

**प्रति,**

**मा.उपसरव्यवस्थापक,**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ,

विभागीय कार्यालय, -------------

**विषय-** आंतरराज्य शेतमाल व्यापार : रस्ते वाहतूक योजने अंतर्गत अनुदान मिळणेबाबत...

**संदर्भ**-आपल्या कार्यालयाचे दि.------------- रोजीचे पुर्वमान्यते चे पत्र

**अर्जदार-** ------------------------(शेतकरी उत्पादक कंपनी /शेतमाल उत्पादक सहकारी संस्थेचे नाव)

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आमच्या --------------------------------------------------- (कंपनी/सह.संस्था नाव) पुर्वमान्यता देण्यात आलेली होती. यास अनुसरून महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत सुरू करण्यात आलेल्या आंतरराज्य शेतमाल व्यापार: रस्ते वाहतूक योजनेमध्ये सहभागी होऊन आमच्या सभासदांचा ----------------- हा नाशवंत शेतमाल------------------------या राज्यामध्ये विक्री केलेला आहे. विक्रीपश्चात प्राप्त रक्कम अनुषंगिक खर्च वजा जाता वजनानुसार सभासदांच्या बँकखात्यावर जमा केलेली असुन याचा सविस्तर तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे.

**प्रत्यक्ष शेतमाल विक्रीचा तपशील खालील प्रमाणे असुन सोबत जोडलेला आहे.**

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | होय/नाही |
|---|---|---|
| १. | पुर्व मान्यता पत्र | |
| २. | ट्रान्सपोर्ट एजन्सीचे व खरेदीदाराच्या बीलांचा तपशील **(परिशिष्ट-१)** | |
| ३. | उत्पादक शेतक-यांच्या शेतमालाच्या वजनानुसार प्रत्यक्ष खात्यावर जमा केलेल्या रक्कमेचा तपशील **(परिशिष्ट-२)** | |

तरी उपरोक्त नमुद केलेनुसार आमच्या कंपनी/सह.संस्थेस वाहतूकीपोटी आलेल्या खर्चास अनुसरून नियमाप्रमाणे अनुदान मंजूर करावे ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी -

नाव -

शिक्का-

(शे.उ.कं./सह.संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक/अध्यक्ष)

**सोबत**-वरीलप्रमाणे

(परिशिष्ट-१)

**वाहतूक संदर्भातील व खरेदीदाराचा बीलांचा सविस्तर तपशील (सोबत जोडावीत)**

| अ.क्र. | तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | शेतमाल भरलेल्या ट्रकच्या वजनाची पावती (काटा पावती) | मूळ प्रत |
| २. | ट्रकचे सुरूवातीचे व अंतिम ठिकाणाचे रिडींग्ज | १.सुरूवातीचे रिडिंग------------------<br>२.ठिकाणाचे नाव--------------------<br>३.दिनांक व वेळ--------------------<br>४.अंतिम ठिकाणचे रिडिंग-------------------<br>५.ठिकाणाचे नाव(राज्य) ---------------<br>३.एकुण कि.मी.------------------------ |
| ३. | शेतमाल ज्या मार्केटमध्ये पाठविण्यात आलेला आहे त्या मार्केटची आवक पावती | मूळ प्रत |
| ४. | ट्रान्सपोर्ट एजन्सीचे बील व एलआर पावती | मूळ बील |
| ५. | शेतमाल खरेदी करणा-या खरेदीदाराकडुन खरेदीपश्चात देण्यात आलेली रकमेची पावती (पट्टी) | मूळ पावती |

कंपनी/सह.संस्थेचा शिक्का

## परिशिष्ट-२

**आंतरराज्य शेतमाल व्यापार: रस्ते वाहतूक योजनेअंतर्गत शेतमाल प्रत्यक्षात पाठविण्यासाठी झालेला खर्च, सर्व्हीस चार्जेस, इत्यादी खर्च व उत्पादक शेतक-यांच्या शेतमालाच्या वजनानुसार प्रत्यक्ष बँकखात्यावर जमा केलेल्या रक्कमेचा तपशील,**

**तक्ता क्रं.१:**

**शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी शे.उ.कं/शे.उ.सह.संस्थेस प्रत्यक्ष झालेल्या खर्च,सर्व्हीस चार्जेस,इत्यादी खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे,**

| अ.क्रं. | तपशील | खर्च (रू) |
|---|---|---|
| १. | शेतमाल हाताळणी, पॅकींग, हमाली, इ. | |
| २. | वाहतूक भाडे रक्कम | |
| ३. | सर्व्हीस चार्जेस | |
| | **एकुण** | |

- शे.उ.कंपनी अथवा संस्थेने उपरोक्त नमुद केलेले खर्च हे आकारणी केलेच पाहिजे असे बंधनकारक नाही.परंतु,गरजेनुरूप आकारणी करू शकतात.

**तक्ता क्रं.२:**

**तक्ता क्रं.१ मधील खर्च वजा जाता उत्पादक शेतक-यांच्या शेतमालाच्या वजनानुसार प्रत्यक्ष बँकखात्यावर जमा केलेल्या रक्कमेचा तपशील,**

| अ.क्र. | उत्पादक शेतक-याचे नाव | पत्ता व मोबाईल नं | शेतमाल प्रकार | वजन (क्विं.) | जमा रक्कम (रू)* |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | **एकूण** | | | | |

* जमा करण्यात आलेल्या रक्कमेबाबत पासबुकच्या पहिल्या पानाची व खात्यावर जमा झालेली रक्कम दर्शविणा-या पानाची छायांकित प्रत जोडण्यात यावी.

कंपनी/सह.संस्थेचा शिक्का